प्रसिध्दी पत्रक  दिनांक : २८/०६/२०२४

**सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी श्री नारायण यशवंत राऊत यांची ६१,२३,७७९/– रूपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (४०.४३ %) निष्पन्न झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे अपसंपदेचा गुन्हा दाखल**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो.स्टे. भाग्यनगर जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं. २७३/२०२४ कलम १३ (१) (ई), १३ (२), १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ आणि कलम १०९ भा.दं.वि. |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २७.०६.२०२४ रोजी १४.०७ वा. |
| तक्रारदार यांचे नाव | श्री. संदिप बाबुराव थडवे, पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १. नारायण यशवंत राऊत, वय ६२ वर्षे, सेवानिवृत्त उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्र. १९, मुदखेड, ता.मुदखेड जि. नांदेड (वर्ग –१)<br>२. सौ. सुनिता भ्र.नारायण राऊत, वय ५४ वर्षे, व्यवसाय गृहीणी, दोघे रा. सहयाद्री नगर, नांदेड |
| निरीक्षण कालावधी | दिनांक ०१.०७.२००१ ते ०५.०९.२०१९ |
| अपसंपदा रक्कम | ६१,२३,७७९/– रुपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता (कायदेशिर उत्पन्नाचे तुलनेत ४०.४३ %) |
| थोडक्यात माहिती | आरोपी लोकसेवक श्री नारायण यशवंत राऊत, सेवानिवृत्त उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्र. १९, मुदखेड, ता.मुदखेड जि. नांदेड (वर्ग –१) यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. लोकसेवक यांनी संपादित केलेली मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केली किंवा कसे याबाबत त्यांना वेळोवेळी संधी देवून माहिती घेण्यात आली होती. परंतु त्यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत ते पुष्टीदायक पुरावे सादर करू शकले नाहीत. त्यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त किंमतीची मालमत्ता स्वत:चे नावे, पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांच्या नावे संपादित केल्याचे उघड चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. त्यांनी संपादित केलेली रू. ६१,२३,७७९ /– किंमतीची बेहिशोबी मालमत्ता ही त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या तुलनेत ४०.४३ % जास्त असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे.<br>सदरहू विसंगत बेहिशोबी मालमत्ता संपादित करण्यासाठी आरोपी लोकसेवक नारायण यशवंत राऊत यांना त्यांची पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांनी मदत करून गुन्हयास प्रोत्साहित करून अपप्रेरणा दिली आहे. म्हणून त्या दोघांचे विरूध्द वरील प्रमाणे अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री गजानन बोडके पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड,युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner